# नियमित दिवाणी दावा क्र.९०/२०१७ मधील नि.४८ए खालील आदेश

(विष्णू महादेव माळी विरुध्द प्रकाश माळी वगैरे)

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ६, नियम १७ प्रमाणे दावा व तुर्तातुर्त मनाई अर्ज दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा निरंतर मनाईसाठी दाखल केला असून दाव्यामध्ये नि.५ चा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज देखील दिला आहे. दावा व तुर्तातुर्त मनाई अर्जातील परिच्छेद २ब मधील ''अशा पध्दतीने ........................ खरेदी घेतली आहे'' या मजकूरामध्ये नमूद असलेली तारीख ''दि.१३/०१/२००४'' ही टायपिंग दोषाने चूकीची नमूद केलेली असून त्याऐवजी ''दि.०६/०१/२००४'' असे बरोबर तारीख नमूद करण्यात यावी. तसेच दावा व तुर्तातुर्त मनाई अर्जामध्ये सर्व ठिकाणी ''क्षेत्र'' असा शब्द नजरचूकीने टाईप झाला असून त्याऐवजी ''हिस्सा'' असा शब्द नमूद करण्यात यावा. वादीचे पुढे असे कथन आहे की, सदरच्या चूका या टायपिंग दोषामुळे झाल्या असून त्या तांत्रिक स्वरुपाच्या आहेत. तसेच दाव्याचे व अर्जाचे न्यायनिर्णयावेळी तांत्रिक अडचण निर्माण होणार आहे. अर्ज मंजूर केलेस प्रतिवादींचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. तसेच दाव्यातील व तुर्तातुर्त मनाई अर्जातील कथनांमध्ये कोणताही बदल होत नाही अगर प्रतिवादींचे कथनास बाधा येत नाही. सबब, वादीने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र.१ ते ४, ७, १०, १४ व १९ यांनी आपले म्हणणे नि.५३ए कडे दाखल करुन अर्जातील मजकूर नाकारलेला आहे. प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, वादीने तारखेमध्ये व क्षेत्रामध्ये बदल करण्याची विनंती केली असून प्रत्यक्षात वादीचा हक्क व मालकीचे स्वरुपात पूर्ण बदल होत आहे. त्यामुळे, अशा प्रकारची दुरुस्ती कायद्याने करता येत नाही. तसेच दुरुस्तीमुळे दावेचे स्वरुपात बदल होत आहे. सबब, प्रतिवादींनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेख पाहिला. दोन्ही पक्षकारांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५. सदरचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द निरंतर मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादीने प्रस्तुत अर्जाचे पुष्टयर्थ नि.४९ए कडे आपले प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच वादीने नि.५१ सोबत अ.क्र.१ कडे गट क्र.७२७ मधील विहीरीबाबत वादीस विश्वनाथ परशराम माळी व सुर्यकांत

परशराम माळी यांनी करुन दिलेल्या खरेदीदस्ताची नक्कल जोडली असून त्याचे अवलोकन केले असता सदरील दस्त दि.६/१/२००४ रोजीचा असलेचे दिसून येते. त्यामुळे वादीचे दुरुस्ती अर्जातील कथनास कागदोपत्री पुराव्याने पुष्टी मिळत आहे. त्यामुळे, वादीचे कथनानुसार त्याचे दावेमध्ये व तुर्तातुर्त मनाई अर्जामध्ये सदरील खरेदीदस्ताची तारीख ६/१/२००४ ऐवजी चूकीने १३/१/२००४ अशी नमूद झालेबाबतच्या कथनामध्ये तथ्य दिसून येते. त्यामुळे सदरची चूक ही टायपिंग दोषाने झाली असलेची शक्यता नाकारता येत नाही. सदरील चूक ही तांत्रिक स्वरुपाची व टायपिंग दोषाची असून त्यामुळे एकूणच दावेचे व तुर्तातुर्त मनाई अर्जाचे कथनामध्ये कोणताही बदल होणार नाही. त्याचप्रमाणे वादीने दावेमध्ये व तुर्तातुर्त मनाई अर्जामध्ये ज्याठिकाणी 'क्षेत्र' असा जो शब्द टाईप झाला आहे त्याऐवजी 'हिस्सा' असा शब्द नमूद करण्याची विनंती केली आहे. सदरील दुरुस्तीने देखील दावेचे व तुर्तातुर्त मनाईचे अर्जामध्ये कोणताही बदल होत नाही. तसेच दावेचे स्वरुपात कोणताही बदल होत नाही. त्यामुळे, प्रतिवादींचे कथनास कोणतीही बाधा येत नाही. सदरची चूक वादीस समजल्यानंतर चूक दुरुस्ती करण्यास परवानगीसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. वादीचा दावा हा निरंतर ताकीदीसाठी असल्याने दावा मिळकतीचे योग्य व अचूक वर्णन अभिलेखावर येणे जरुरीचे आहे. तसेच प्रस्तुतची दावा दुरुस्ती दावा व ताकीदीचा अर्ज गुणदोषावर निकाल होण्यासाठी व कोणतीही तांत्रिक अडचण राहू न देणेसाठी आवश्यक आहे. तसेच, प्रस्तुत दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलत नाही अगर प्रतिवादीचे कथनास बाधा येत नाही. दावा दुरुस्ती अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादी यांचे काहीही नुकसान होणार नाही. सबब, वरील सर्व विवेचनाचा विचार करता अर्ज मंजुर करणेच्या निष्कर्षाप्रत मी आले आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादीवर खर्च र.रु.१००/– बसवून ती प्रतिवादींना देणेचे अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीने प्रतिवादींना खर्च र.रु.१००/– दिलेनंतर त्याचे दुरुस्ती अर्जाप्रमाणे दाव्यामध्ये व तुर्तातुर्त मनाई अर्जामध्ये कायद्यानुसार देय मुदतीमध्ये दुरुस्ती करावयाची आहे व दावा दुरुस्ती प्रत न्यायालयात दाखल करावयाची आहे.

३. वादीने वरीलप्रमाणे विहीत मुदतीत दावा व तुर्तातुर्त मनाई अर्जामध्ये दुरुस्ती केली नाही तर प्रस्तुतचा आदेश रद्दबातल समजण्यात यावा.

Sd/–

तासगांव (सौ. टी.एस. महाडिक)

दि.२३.०८.२०१८ २ रे सह–दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, तासगांव